# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक १७/०७/२०१७ (सोमवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

**पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत ०९ किमी अंतरावर वार्ड नं. १ पिपळा डाग बंगला येथे दिनांक १०/०७/२०१७ ते १६/०७/२०१७ चे ०९.३० ते १०.३० दरम्यान कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे - प्रमोद वामणराव सावरकर, वय ३२ वर्ष, रा. वार्ड नं. १ पिपळा डाग बंगला हा चार दिवसा पासुन बाहेर गावी असल्याने दिनांक १६.०७.२०१७ ला आपल्या राहत्या घरी परत आला असता समोरील लागलेल्या दाराचे कुलुप व कोंडा तोटलेला दिसल्याने आत प्रवेश करून वरती असलेल्या आलमारीतील सामान अस्तव्यस्त स्थितीत होते व कपाटातील सोन्याचे व चांदीचे दागीने किंमती १५,५००/- रु. व नगदी १,५००/-रू. असा एकुण किंमती १७,०००/- रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवादार श्री. वसंता धपके हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. खापरखेडा** :- अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावर पारशिवनी टी पाईंट, सावली रोड येथे दिनांक १६/०७/२०१७ चे ०७.४५ वा. ते ०८.१५ वा. दरम्यान यातील ट्रक क्र. एम. एच-३१/डीएस-५४४४ चा चालक आरोपी नामे - सचिन ईश्वर खंगार, वय २१ वर्ष २) ट्रक मालक मंगेश कवडु बागडे, वय २५ वर्ष, दोन्ही रा. सावली यांनी वर नमुद वाहनात विनापरवाना व अवैधरीत्या कन्हान नदीचे लिलाव न झाल्याने सावली रेतीघटातुन ०२ ब्रॉस रेती किमती ४,०००/-रुपयाची भरुन चोरुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने वाहनासह एकूण किंमत ६,०४,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी खापरखेडा पोलीसांनी फिर्यादी नामे- सरकारतर्फे पोलीस नाईक श्री. सुरेंन्द्र वासनिक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपी विरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. नामदेव धांडे हे करीत आहे.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर  जिल्हा (ग्रामीण), नागपूर